# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १६१/२०११-१२ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. महेश धानाप्पा बाबानगर,<br>मु.पो. सिंदूर, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. महेश धानाप्पा बाबानगर, मु.पो. सिंदूर, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग विरुध्द तक्रार दि. १३.१.२०१२ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार ग्राहकाने स्वतःचे् घराच्या कनेक्शनसाठी वितरण कंपनीकडे दि. ६.६.२००७ रोजी रु.५००/- पावती क्रमांक ४१६०१३४ भरले आहेत. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार त्यांस दि. ५.६.२००८ पर्यंत कनेक्शन मिळणे आवश्यक होते, ते अद्याप मिळाले नाही.

वितरण कंपनीने आपल्या दि.२२.२.२०१२ च्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहकाने दि. ६.६.२००७ रोजी चलन भरलेले आहे व त्यांचे लघुदाब वाहिनीचे काम करुन त्यांना दि. ११.२.२०१२ रोजी वीज जोडणी देण्यात आलेली आहे. जत उप विभागात लघुदाब वाहिनी तयार करुन वीज जोडणी द्यावी लागणाऱ्या ग्राहकांची संख्या जादा असल्याने व हा भाग डोंगराळ असल्याने सदर काम करण्यास उशीर झाला असे म्हटले आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. २३.२.२०१२ रोजी घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदार स्वतः हजर. वि.प.तर्फे श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता उपस्थित, नोडल ऑफीसर गैरहजर. वि.प.तर्फे श्री. कुलकर्णी यांनी ग्राहकास वीज जोडणी दिली आहे असे सांगितले. तक्रारदार यांनी मंचासमोर असे प्रतिपादन केले की, दि. ६.६.२००७ ला अर्ज करुन कोटेशनची रक्कम भरली. त्यानंतर सर्व्हीस कनेक्शनसाठी मटेरियल उपलब्ध नसल्यामुळे वीज जोडणी देण्यास विलंब झाला. १ पोलचे काम आहे. दि. १६.२.२०१२ ला मीटर नेले आहे असे सांगितले. दि. ११.२.२०१२ ला पोल उभे करुन तारा ओढल्या आहेत असे सांगितले. थोडक्यात, लेखी अहवालातील वि.प.चे म्हणणे चुकीचे आहे असे सांगण्याचा ग्राहकाने प्रयत्न केला.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होत आहेत.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे विद्युत पुरवठा करण्याचे आदेश वि.प.स देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

२) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे विलंबापोटी भरपाई मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

## कारणमिमांसा

ग्राहकाने आपल्या तक्रारीसोबत कोटेशनची झेरॉक्स प्रत जोडली आहे. त्यात अर्जाची तारीख १६.३.२००७ दर्शविली आहे. अंदाजपत्रक २००७ - २००८ ला मंजूर झाल्याने त्याप्रमाणे ग्राहकाने रु. ५०७/- दोन वेगवेगळया पावत्यांनी दि. ६.६.२००७ ला भरले आहेत. ग्राहकाचे ०.१८ कि.मी. चे १ पोलचे काम आहे. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी विलंब का झाला या बाबत मंचासमोर लेखी / तोंडी स्पष्टीकरण दिले नाही. या उलट, दि. ११.२.२०१२ ला वीज जोडणी झाली असा अहवाल दिला आहे, प्रथमदर्शनी तो ग्राह्य वाटत नाही. कार्यकारी अभियंता या सारख्या जबाबदार व्यक्तीने दि. २२.२.२०१२ च्या लेखी अहवालावर सही करतांना खरोखरच वीज जोडणी झाली आहे का ? याची खात्री करणे आवश्यक होते.

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

ग्राहकाने मंचाला अग्रेषित केलेल्या आपल्या दि. २३.२.२०१२ च्या पत्रात घरगुती कनेक्शनसाठी दि.११.२.२०१२ रोजी पोल उभा करुन तारा ओढलेल्या आहेत व दि. १६.२.२०१२ रोजी ग्राहकाने स्वतः बिलूर ऑफीसमधून मीटर नेलेले आहे व अद्याप कनेक्शन जोडलेले नाही असे नमूद केले आहे व मंचासमोर सुनावणीवेळी तोंडी प्रतिपादन केले आहे.

त्यामुळे कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार घरगुती कनेक्शनसाठी १ महिन्याची मुदत आहे. दि. ११.२.२०१२ ला १ पोलचे काम करुन वीज जोडणी झाली आहे असे गृहीत धरले तरी विलंब झाला आहे हे निश्चित, त्यासाठी लेखी / तोंडी खुलासा वि.प.ने केलेला नाही. याबद्दल वि.प.चे स्थानिक अधिकारी यांनी केवळ दूर्लक्ष केले किंवा निष्क्रीयता दाखविली आहे. कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात अक्षम्य दूर्लक्ष केल्याचे स्पष्ट होते. ग्राहकास सुरक्षित व कृती मानकातील तरतुदीनुसार वीज जोडणी देणे जरुरी होते. त्यामुळे वीज जोडणीस झालेल्या विलंबापोटी भरपाई देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे व ग्राहकाचा तो हक्क आहे. दि. ६.७.२००७ पासून प्रत्यक्ष वीज जोडणी देईपर्यंतच्या कालावधीतील विलंबापोटी कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार प्रति आठवडा रु. १००/- भरपाई वि.प.ने ग्राहकास देण्याचे आदेश करणे योग्य होईल असे मंचाचे मत आहे. मुद्दा क्र. १ व २चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश-

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी ग्राहकास त्वरित सुरक्षित व कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार विद्युत पुरवठा द्यावा व तसा अहवाल मंचास द्यावा.

३) वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी ग्राहकास दि.६.७.२००७ पासून वीज जोडणी देईपर्यंतच्या कालावधीतील विलंबापोटी कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे भरपाई द्यावी. सदर रकमेचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम रोखीने ग्राहकास द्यावी. त्याचा लेखी अहवाल मंचास द्यावा.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com